**विवाहसमारंभातील एक अनुभव**

सध्या लग्नसराईचे दिवस आहेत. वधू-वर त्यांचे आप्तेष्ट यांची दागदागिने, उंची वस्त्रे खरेदीची धांदल उडून गेली आहे. मंगल कार्याचे मंडप पताकांनी, फुलांनी सजलेले दृष्टीला पडतात. हे सारे पाहण्यातही एक आनंद असतो. शिष्टाचार म्हणून आप्तस्वकीयांच्या गाठीभेटी होतात, म्हणून मी आवर्जून या कार्यांना जाते. काही दिवसापूर्वीची गोष्ट, अशीच एका मंगल कार्यात घडलेली! कार्यालय नातेवाईक, स्नेहीमंडळींनी अगदी गच्च भरून गेलेले. सौम्य अत्तरचा गंध वातावरणात दरवळला होता. यौवनाच्या देहलीवर उभ्या असलेल्या, बहुमोल वस्त्रालंकारांनी विभूषित झालेल्या वधू-वरांचे चेहरे हर्षाने प्रफुल्लित झालेले. पुरोहित मंगलाष्टके म्हणत होते. ती पुरी होऊन वधू-वरातील अंतरपाट दूर होणार व ते एकमेकांना पुष्पहार घालणार एवढ्यात एक अनपेक्षित दृश्यच बघायला मिळाले. नववधूसमोर उभ्या असलेल्या वराला त्याच्या काही स्नेही-सोबत्यांनी पाटावरून उचलून एकदम उंच केले. वराच्या तुलनेने वधू किंचित कमी उंच होती. ती एवढ्या उंच वरमाला घालणार कशी? तेव्हा तिच्याही सख्या-पार्वतींनी तिलाही उचलून धरले. तरीही वरमाला घालताना तिची बरीच तिरपीट उडाली. योगायोगाने ती माला वराच्या गळ्यात पडली खरी, पण समजा ती तशी पडली नसती किंवा वराच्या गळ्यात घालताना ती या चमत्कारिक अवघडलेल्या स्थितीने तुटली असती तर.. ?

आपण स्वतःला कितीही आधुनिक विचाराचे मानत असलो, तरी अशा घटना पाहून नकळत कसल्या तरी अशुभाची पाल अनेकांच्या मनात चुकचुकल्याशिवाय राहात नसेल, असे मला प्रांजळपणे वाटते. मित्र-मैत्रिणींनी वधू-वरांना पुन्हा मूळ जागी उभे केले. दोन्हीकडचे उपाध्याय निरुपायाने हा सारा प्रकार पाहत होते. मला नवल, वाटते ते याचे की, विवाह समारंभाला उपस्थित असलेल्या आप्तेष्टांनीही तरूणांच्याच उत्साहाने टाळ्यांचा कडकडाट केला. कोणी तरूणांनी गर्जना केली, "शिवाजी महाराजकी जय! ", तर कुणी म्हणाले, "बोला हरहर महादेव! " मला स्वतःला तो सगळा गलबला आणि विशेषतः वरमाला घालण्याच्या वेळचा उंचाउंचीचा प्रकार खटकल्यावाचून राहिला नाही. खरं तर मल तो अनुचितच वाटला. याचे कारण आपली भारतीय संस्कृती ही विवाहाला जीवनातला एक मंगल, महत्वाचा आणि अतिशय मोलाचा असा 'संस्कार' मानते. पाश्चात्यांप्रमाणे तो 'करार' नसतो. केवळ दोन माणसेच नव्हे तर दोन कुटुंबे विवाहाच्या निमित्ताने एकत्र येत असतात, आयुष्यभराचे एक अतूट, जिव्हाळ्याचे, सुदृढ नाते त्यांच्यात निर्माण होत असते. वधू-वरांचे सर्वस्वी नवे, मधुर असे सहजीवन त्या क्षणापासून सुरू होणार असते. त्या सहजीवनाची गोड सनई त्यांच्या कानामनात गुंजत असते. आणि म्हणूनच विवाहप्रसंगी औचित्यविचाराचे भान साऱ्यांकडूनच राखले जायला हवे. म्हणूनच भसाड्या आवाजातील कर्णकर्कश्श्य गाणीही त्यावेळी न लावणे बरे.

मला तर उपाध्यायांना विनंती कराविशी वाटते की, वधू-वरांना जे मंत्र म्हणायला सांगतात त्यांचा अर्थही त्यांनी समजून सांगावा. त्यामुळे नव दांपत्याला आपल्या भावी जीवनातल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांची यथोचित कल्पना येईल. त्यावेळी जास्तीतजास्त आप्तस्नेह्यांनी जवळ बसावे, म्हणजे दुधात साखर-केशरच पडल्यसारखे होईल. विवाह हा पोरखेळ नसून ते एकात्म मनाने गावयाचे जीवनगाणे आहे, सुसंस्कार आहे याची सुखद जाणीव सर्वांना अंतर्मुख करील.